गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक २५९ वा ● शुक्रवार ०९ फेब्रुवारी २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 259 | Date : 09/02/2024 blow :Friday Page 4 Price 4

## पूर्व प्राथमिक ते चौथीपर्यंतचे वर्ग सकाळी नऊनंतर भरवण्याच्या सूचना

### विद्यार्थी उत्साही वातावरणात शिक्षण घेऊ शकतील : शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर





मुंबई : राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळांनी पूर्व प्राथमिक ते चौथी पर्यंतचे वर्ग भरवण्याबाबतची वेळ सकाळी नऊ किंवा नऊ नंतर ठेवावी, अशी सूचना शालेय शिक्षण विभागामार्फत करण्यात आली आहे. विभागामार्फत अभ्यास करुन तज्ज्ञांशी चर्चा करुन हा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे विद्यार्थ्यांची झोप पूर्ण होईल आणि ते उत्साही वातावरणात शिक्षण घेऊ शकतील, असा विश्र्वास शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी व्यक्त केला.

राज्यपाल रमेश बैस यांनी शालेय शिक्षण विभागाला सकाळच्या सत्रातील शाळांच्या वेळेबाबत विचार करण्याबाबत सूचना केली होती. त्यानंतर मंत्री श्री. केसरकर यांच्या निर्देशानुसार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत राज्यातील विविध शाळांच्या वेळा विचारात घेऊन शाळांची वेळ बदलण्याविषयी अभ्यास करण्यात आला. हा अभ्यास करण्यासाठी राज्यातील शिक्षण तज्ज्ञ, शिक्षण प्रेमी, पालक तसेच प्रशासनातील अधिकारी यांचे देखील अभिप्राय नोंदविण्यासाठी गुगल लिंक उपलब्ध करून देण्यात आली होती. गुगल लिंक वरील अभिप्राय व विविध शिक्षण तज्ज्ञ व शिक्षण प्रेमी व पालक यांच्याशी चर्चा केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून हा निर्णय लागू होणार आहे.

शाळेच्या वेळात बदल करताना बालकांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार कायदा २००९ नुसार शालेय शिक्षणासाठी अध्ययन अध्यापनाच्या निश्र्चित केलेल्या कालावधीत कोणतीही बाधा येणार नाही, याची दक्षता संबंधित शाळा व्यवस्थापनाने घ्यावी. ज्या शाळेच्या व्यवस्थापनांना आपल्या शाळांची वेळ बदलणे अगदीच शक्य होत नसेल त्यांच्या अडचणी प्रकरण परत्वे संबंधित जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी/ शिक्षण निरीक्षक (प्राथमिक) यांनी मार्गदर्शन देऊन सोडविण्याची तजवीज करावी. यासाठी संबंधित शाळेच्या व्यवस्थापनाने आपल्या जिल्ह्यातील शिक्षणाधिकारी/ शिक्षण निरीक्षक (प्राथमिक) यांच्याशी संपर्क साधून प्रकरण परत्वे मार्गदर्शन घेऊन कार्यवाही करावी, असेही या परिपत्रकानुसार स्पष्ट करण्यात आले आहे.

या अनुषंगाने केलेल्या अभ्यासामध्ये पुढील बाबी समोर आल्या आहेत. काही शाळा विशेषतः खासगी शाळा भरण्याच्या वेळा या साधारणपणे सकाळी सात नंतर असल्याचे दिसून येते. विविध कारणांमुळे विद्यार्थी रात्री उशिराने झोपत आहेत व सकाळी लवकर शाळा असल्याने त्यांची झोप पूर्ण होत नाही. ज्याचा नकारात्मक परिणाम विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर होताना दिसत आहे. पालकांच्या मते पाल्याची झोप ही सकाळी पूर्ण न झाल्याने ते शाळेत जाण्यास लवकर उठण्यासाठी तयार नसतात आणि रात्रीची झोप पूर्ण होत नसल्याने ते दिवसभर आळसलेले दिसून येतात. त्यामुळे । पान २ वर

## श्रीमंतांनी अन्य मागासवर्गीयांसाठी आरक्षणाचे लाभ सोडून द्यावेत

नवी दिल्ली : मागासवर्गीय कोट्यातून आरक्षणाचा लाभ घेतलेल्या श्रीमंतांनी अन्य मागासवर्गीयांसाठी आरक्षणाचे लाभ सोडून द्यावेत, असे स्पष्ट मत सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केले. पंजाब सरकारच्या अनुसूचित जाती आणि जमातींमधील पोटजातींना आरक्षण देण्याच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकांची एकत्रित सुनावणी सर्वोच्च न्यायालयात सुरू आहे. सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांच्या पीठासमोर ही सुनावणी सुरू आहे.

यावेळी न्यायालयाने म्हटले की, मागासवर्गीय आरक्षणाचा लाभ घेऊन जे श्रीमंत झाले आहेत, त्यांनी आरक्षणाचे लाभ सोडून देण्याची गरज आहे. समाजातील अन्य मागास लोकांना आरक्षण मिळवून देण्यासाठी मागास समुदायातील श्रीमंतांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून आरक्षण सोडून द्यावे. त्यामुळे सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागास राहिलेल्या आणि आरक्षणाचे लाभ मिळत नसलेल्या मागासघटकांना लाभ मिळेल. ई. व्ही. चिन्नाहविरुध्द आंध्र प्रदेश सरकार खटल्यावेळी २००४ साली सर्वोच्च न्यायालयाने सजातीय अनुसूचित जातीत पोटजाती अथवा उपवर्गवारी करता येत नसल्याचा निर्वाळा दिला होता. पंजाब सरकारच्या खटल्याप्रकरणी सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाच्या त्या निकालाचा संदर्भ घेण्यात आला आहे. त्या निकालाचे पुनरावलोकन करण्याच्या मुद्द्यावरही सुनावणीत चर्चा झाली. पंजाब सरकारने २००६ साली अनुसूचित जातीतील पोटजातींना ५० टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला होता. पंजाबमधील उच्च न्यायालयाने हा निर्णय रद्दबातल ठरविला होता. या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू झाली आहे. याप्रसंगी खंडपीठाने म्हटले आहे की, आरक्षणाचा हेतू साध्य झाल्यास त्याचे लाभही सोडून द्यायला हवेत. आरक्षणाचे लाभ घेऊन श्रीमंत झाल्यानंतर लाभ सोडून देण्यास काय हरकत आहे.

## पुणे चक्राकार मार्गामुळे विकासाच्या नवीन संधी निर्माण होणार : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

पुणे : पुणे चक्राकार मार्गामुळे पुणे, पिंपरी-चिंचवड, पीएमआरडीए क्षेत्रात विकासाच्या नवीन संधी तसेच अडीच लाख कोटी रुपयांची अर्थव्यवस्था नव्याने निर्माण होणार आहे; हा मार्ग येत्या काळात पुण्याच्या विकासाचे ते इंजिन ठरेल, असा विश्र्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघातील ससून रुग्णालय चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांकरीता नूतन निवासी इमारत, महात्मा गांधी पूलगेट बसस्थानकाचे आधुनिकीकरण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसराचा विकास, संगम घाटावरील संगमेश्र्वर गणेश विसर्जन घाट नूतनीकरण व नागरिकांसाठी निवारा केंद्र, आणि धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज बॉटनिकल उद्यानाच्या भूमिपूजन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, आमदार भीमराव तापकीर, माधुरी मिसाळ, सिद्धार्थ शिरोळे, सुनील कांबळे, माजी मंत्री दिलीप कांबळे, माजी खासदार संजय काकडे, माजी आमदार योगेश मुळीक, योगेश टिळेकर, माजी महापौर मुरलीधर मोहोळ आदी उपस्थित होते.




उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, पुणे रिंगरोड महत्त्वाचा असून त्यासाठी ८० टक्के भूसंपादन पूर्ण होत आहे. येत्या काळात या मार्गाचे काम सुरु करण्यात येणार आहे. आयटीपार्कच्या भागात आस्थापनांपर्यत जाण्यासाठी मेट्रोला जोडून स्कायबस सुरू करण्यात येणार असून येत्या काळात भूमीपूजन करण्यात येणार आहे. यामुळे आस्थापनांपर्यंत जाण्यासाठी वाहनाची आवश्यकता लागणार नाही आणि प्रदूषण होणार नाही.वाहतूक नियोजनासाठी मेट्रोला कनेक्टिव्हिटी देण्याचे काम करण्यात येणार आहे. खोपोली ते खंडाळा दरम्यान ९ किमी मिसिंग लिंकचे काम करण्यात येत असून यामुळे मुंबई-ते पुणे दरम्यानचे । पान २ वर

## आरबीआयचे पतधोरण जाहीर






मुंबई : रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या (आरबीआय) पतविषयक धोरण समितीने सलग सहाव्यांदा रेपो रेटमध्ये कोणताही बदल केलेला नाही. तो ६.५० टक्के एवढा कायम ठेवला आहे. याबाबतचा निर्णय गुरुवारी आरबीआयचे गर्व्हनर शक्तिकांत दास यांनी जाहीर केला. पतविषयक धोरण समितीच्या सहा सदस्यांनी ५ -१ असा बहुमताने रेपो रेट ६.५० टक्क्यांवर कायम ठेवण्याचा निर्णय घेतला असल्याचे दास यांनी सांगितले. दास म्हणाले की, रिझर्व्ह बँकेने जोखीम समतोल राखून आर्थिक वर्ष २०२५ साठी ७ टक्के वास्तविक जीडीपी वाढीचा अंदाज बांधला आहे. चालू आर्थिक वर्षात किरकोळ महागाईवाढीचा दर ५.४ टक्के, २०२४-२५ साठी ५.५ टक्के असेल. महागाईत घट होण्याचा शेवटचा टप्पा यशस्वीपणे पार करण्यासाठी आर्थिक पतविषयक धोरण । पान २ वर

## श्री क्षेत्र भोगलिंगेश्वर मठ मुगळी येथे १३ एप्रिल रोजी मोफत सर्वधर्मीय सामुदायिक विवाह

अक्कलकोट/प्रतिनिधी : तालुक्यातील मुगळी येथील श्री क्षेत्र भोगलिंगेश्र्वर सुरगी संस्थान मठ वार्षिक यात्रा महोत्सानिमित्त शनिवार दि.१३ एप्रिल २०२४ रोजी सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती श्री भोगलिंगेश्र्वर सुरगी मठ संस्थानाचे मठाधिपती श्री भोगेश्र्वर महास्वामीजी यांनी दिली आहे.



संस्थानाचे मठाधिपती श्री भोगेश्र्वर महास्वामीजी यांच्या माध्यमातून समाजातील सर्व स्तरातील लोकांना प्रोत्साहन देण्याचे कार्य गेल्या २५ वर्षापासून निरंतर सुरु आहे. गेल्या २५ वर्षात सुमारे ८५० जोडपी या विवाह सोहळ्यामध्ये विवाहबद्ध झाली आहे. आजच्या महागाईच्या काळात सर्वसामान्यांना लग्नाचा खर्च व नियोजन करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. समाज ऋण व विवाह वेळी येणाऱ्या अडचणी या सर्व गोष्टींचा विचार करून संस्थानाचे मठाधिपती श्री भोगेश्र्वर स्वामीजी यांनी यंदा २६ वा सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन केल्या आहेत. या विवाह सोहळ्यात नोंदणी केलेल्या वधू-वरास मोफत विवाहाचे कपडे, वऱ्हाडी मंडळीच्या भोजनाची सोय, स्वतंत्र मेकअप करण्याची व्यवस्था, वधूस मणी मंगळसूत्र व जोडवे देण्यात येतात. तरी या विवाह सोहळ्यामध्ये जास्तीत जास्त विवाह इच्छुकांनी नोंदणी करावी असे आवाहन संस्थानाचे मठाधिपती श्री भोगेश्र्वर स्वामीजी यांनी केले आहेत. विवाह नाव नोदणी अंतिम दिनांक १२ एप्रिल २०२४ पर्यंत असेल. नाव नोंदणीसाठी संस्थानाचे मठाधिपती श्री भोगेश्र्वर स्वामीजी यांच्याशी संपर्क साधावा अथवा ७७०९६३८४६३/ ९९०१२३३७५५ या मोबाईल क्रमांक वर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आला आहे.

## तीन गोळ्या थेट शरिरात घुसल्याने ठाकरे गटाच्या अभिषेक घोसाळकरांचा मृत्यू,




मुंबई : ठाकरे गटाचे माजी नगरसेवक अभिषेक घोसाळकरांवर झालेल्या गोळीबारात त्यांचा मृत्यू झाल्याचं समोर आलं आहे. दहिसरमधील रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होता. घोसाळकरांच्या दिशेने पाच गोळ्या झाडण्यात आल्या होत्या, त्यापैकी तीन गोळ्या त्यांना लागल्याने त्यांची प्रकृती चिंताजनक होती. त्यांचा मृत्यू झाला आहे. तर गोळीबार केलेल्या व्यक्तीने स्वतःलाही गोळी मारुन संपवलं. बोरिवलीतील पश्र्चिममधील प्रभू उद्योग भवन कार्यालयात अभिषेक यांच्यावर गोळीबार करण्यात आला. पैश्याचा वादातून हा हल्ला झाल्याची माहिती समोर येतेय. अभिषेक घोसाळकर हे ठाकरे गटाचे नेते आणि माजी आमदार विनोद घोसाळकरांचे पुत्र आहेत. मॉरिस नोरोन्हा नावाच्या व्यक्तिकडून अभिषेक घोसाळकरांवर हल्ला झाल्याची माहिती समोर आली. घोसाळकरांच्या दिशेने पाच गोळ्या झाडण्यात आल्या, त्यापैकी तीन । पान २ वर

## जयंत पाटील यांच्याकडून अमोल कोल्हेंच्या उमेदवारीची घोषणा





पुणे : राष्ट्रवादीच्या फुटीपासून चर्चेत असलेल्या शिरुरचे खासदार अमोल कोल्हे यांना शरद पवार गटाकडून उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी त्यांच्या उमेदवारीची घोषणा केली. शिरूर लोकसभा निश्र्चय मेळावा आणि भोसरी विधानसभेची आढावा बैठक जयंत पाटलांच्या उपस्थितीत झाली. या बैठकीत जयंत पाटलांनी अमोल कोल्हेंच्या उमेदवारीर शिक्कामोर्तब केले. अमोल कोल्हे अजित पवार यांनी राष्ट्रवादीला खिंडार पाडल्यापासून चर्चेत आहेत. कोणता झेंडा हाती घेऊ असा मनस्थितीत असल्याचे त्यांच्या वर्तनातून समोर आलं आहे. अजित पवारांच्या शपथविधीला उपस्थित राहिल्यानंतर त्यांनी नंतर भूमिका बदलून शरद पवार यांना पाठिंबा दिला होता. यानंतर निवडणुक आयोगात दोन्ही गटाकडून लढाई सुरु झाल्यानंतर त्यांनी दोन्ही गटाकडून प्रतिज्ञापत्र सादर केले होते. नंतर त्यांनी पुन्हा अजित । पान २ वर

## अक्कलकोट विधानसभा गाव चलो अभियान नियोजन बैठकित ३६९ प्रमुख्याच्या उपस्थितीत संपन्न




अक्कलकोट/प्रतिनिधी : येथे गाव चलो अभियान अंतर्गत संमधीत जबाबदार प्रमुखांनी केंद्र व राज्य शासनाचे लोकल्याणकारी योजनेचे माहिती शेवटच्या घटकातील शोषित पीडित वंचित लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी झटावे असे आवाहन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले. ते अक्कलकोट शहरातील फोर पेटल्स या हॉटेल च्या सभागृहात अक्कलकोट विधानसभा वॉरियर्स, शक्ती केंद्र प्रमुख, शक्ती केंद्र प्रभारी, प्रमुख कार्येकर्ते यांचे बैठकीचे आयोजन करण्यात आलेहोते या आमदार कल्याणीशेट्टी बोलत होते.

सदर बैठक गुरुवारी रोजी गाव चलो अभियान नियोजन बैठकित ३६९ प्रमुख्याच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी व्यासपीठावर आमदार सचिन कल्याणशेट्टी, सरचिटणीस शशिकांत चव्हाण, भाजप जिल्हा युवा प्रमुख सुदर्शन यादव, शिवानंद पाटील, मोतीराम राठोड,शिवशरण जोजन, आप्पासाहेब बिराजदार, उपस्थित होते. या वेळी पुढे बोलताना आ. कल्याणशेट्टी म्हणाले, प्रमुखांनी प्रत्येक बुथवर जाऊन मुक्काम करणे आणि नागरिकांना घरकुल, मोफत गॅस, शेतकरी सन्मान योजना आशा विविध केंद्र व राज्य शासनाचे योजना सर्वसामान्य पर्यंत पोचवणे, लाभार्थ्यांची गाठीभेटी घेणे, प्रचार व प्रसार करणे कामी प्रत्येकाने झटावे असे आवाहन आमदार कल्याणशेट्टी यांनी केले.

यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष मोतीराम राठोड, शिवशरण जोजन, नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी महेश हिंडोळे विवेकानंद उंबरजे, परमेश्र्वर यादवाड, वंदना लोंढे, ज्योती उन्नद, सुरेखा राठोड, तनुजा जवळे, चंद्रकला करिमुंगी, राजकुमार झिंगाडे, प्रकाश पाटील, धनंजय गाढवे,विकास वाघमारे, दुधनी बाजार समितीचे चेअरमन सातलिंगप्पा परमशेट्टी, महीबुब मुल्ला, अणप्पा बाराचारी , विवेकानंद उंबरजे, आप्पासाहेब पाटील, शिवसिद्ध बुळा, परमेश्र्वर यादवाड राम होनराव, प्रभाकर मजगे, एडवोकेट दयानंद उंबरजे, सुनिल कळके, महादेव पाटील, इरेश अंबरे, सुरेखा राठोड, विश्राम गायकवाड, सुरेश नागोर , दयानंद बमनळी ,सीताराम राठोड, प्रदीप पाटील, शिवकुमार चनशेट्टी, दयानंद बिडवे, नन्नु कोरबु, कांतु धनशेट्टी ,प्रदीप जगताप ,लखन झंपले ,राहुल काळे, आदीजण प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.


# संपादकीय

## महाराष्ट्रात बिहारप्रमाणे घटना..

बिहारमध्ये जंगलराज असल्याची हेटाळणी पुरोगामी महाराष्ट्राचा टेंभा मिरवणाऱ्या महाराष्ट्रातील नेत्यांकडून केली जात होती. त्यावेळी ही हेटाळणी काहीअंशी खरीसुध्दा होती. मात्र, अलीकडे ही दोन्ही राज्ये सुधारली. तेथे लोकांमध्ये निर्भयता येऊन कायद्याचे राज्य असल्याचे आता बऱ्यापैकी वाटू लागले आहे. मात्र, स्वत:ला फार प्रगत आणि अन्य राज्यांपेक्षा येथे कायद्याचे राज्य असल्याची फुशारकी मारुन आपल्याच पाठीवर थाप मारुन घेणाऱ्या भाजपच्या नेत्यांना लाज वाटावी अशी घटना त्यांच्याच पक्षाच्या आमदाराने करावी, यापेक्षा दुर्दैव काय म्हणावे. भाजप हा सुसंस्कृत लोकांचा पक्ष असल्याचा लोकांचा समज कल्याणमध्ये आमदार गणपत गायकवाड यांनी खोटा ठरविला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाणे जिल्ह्यातील कल्याणमधील पोलीस ठाण्यात घडलेल्या गोळीबाराच्या घटनेने येथे गुंडाराज असल्याचे दाखवून दिले. गेल्या अडीच वर्षांत राज्यात झालेल्या सत्तांतरानंतर शिवसेना-भाजपची सत्ता आली. मात्र, या दोन्ही पक्षांच्या स्थानिक नेत्यांमधील शीतयुध्दाचे परिणाम राज्यात ठिकठिकाणी पाहायला मिळत आहेत. जमिनीच्या वादातून तक्रारदारांच्यावतीने पोलीस ठाण्यात मध्यस्थी करण्यास गेलेल्या शिवसेनेचे शहरप्रमुख महेश गायकवाड आणि भाजपचे आमदार गणपत गायकवाड यांच्यामध्ये पोलीस ठाण्यात शाब्दिक चकमक उडाली. त्याचे पर्यवसान हाणामारी आणि तोडफोडीत झाले. आमदार गायकवाड यांनी पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षकांच्या कक्षामध्येच महेश गायकवाड यांच्यावर रिव्हॉल्व्हरमधून गोळ्या झाडल्या. त्यामध्ये महेश आणि त्यांचा दुसरा सहकारी राहुल पाटील हे गंभीर जखमी झाले. मुख्यमंत्र्यांच्या ठाणे जिल्ह्यात पोलीस ठाण्याला गँगस्टरचे स्वरुप आले. गोळीबार कोणी व कशामुळे केला याचे सीसीटीव्ही फुटेज समोर असतानाही उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उच्चस्तरीय चौकशीचे आदेश द्यावे म्हणजे आपल्या पक्षाच्या गुन्हेगार प्रवृत्तीच्या आमदाराला वाचवण्याचा हा प्रयत्न दिसतो. ही घटना विरोधी पक्षाच्या आमदाराकडून झाली असती तर आतापर्यंत भाजपने रान पेटवले असते. आमदार गायकवाड यांच्यावर गुन्हा दाखल करुन त्यांना अटक झाली असली तरी भाजपने त्यांची पक्षातून अजूनपर्यंत हकालपट्टी केली नाही. देशात आणि राज्यात येनकेन प्रकारे भाजपची सत्ता राहावी यासाठी कलंकित लोकप्रतिनिधींनाही भाजपकडून आश्रय देणे सुरु आहे.

# आठवणीतील महिला संपादिका दिवंगत रेणुका संतोष चव्हाण...

आपल्या लेखणीतून संपादकीय मधून सातत्याने प्रबोधन, व परिवर्तन घडविणाऱ्या महिला संपादिका म्हणजेच रेणुका संतोष चव्हाण...



भिवंडी तालुक्यातील भोकरी येथे त्यांचा जन्म झाला. लहानपणापासूनच त्यांना शिक्षणाची आवड होती. भोकरी येथे जिल्हा परिषद मराठी शाळेत त्यांनीप्राथमिक शिक्षण पूर्ण केले. तर शारदा विद्यालय पडघे येथे पुढील शिक्षण पुर्ण केले. तर बि ए. एन. महाविद्यालयात बि. ए. मधुन प्रथम श्रेणीत उत्तीर्ण आहेत. तर टेलिफोन ऑपरेटर कोर्स मधून प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्या. तर क्राफ्ट टीचर कोर्स करुन प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होत्या. शिक्षण घेत असताना तेवढ्यावरचन थांबता रेणुका चव्हाण यांनी डिप्लोमा इंन जरनालिजम अँड मास कम्युनिकेशन मधून त्या उत्तीर्ण झाल्या. व शासनमान्य साप्ताहिक बापाचा बाप 'संपादिका' म्हणून

धुरा सांभाळली. सामाजिक कार्याची आवड जोपासत त्यांनी सामाजिक बांधिलकी जपून ठेवली.

आंतरजातीय विवाह करून आणि जातीयतेच्या बेड्या तोडूनसमाजापुढे संतोष चव्हाण व रेणुका चव्हाण यांनी एक आदर्श निर्माण केला.

समाजात महिलांनी देखील पुढे यावे, आपल्या पती बरोबरच आपण देखील समाजात काम करावे,याचं उत्तम उदाहरण म्हणजे संपादिका दिवंगत रेणुका संतोष चव्हाण...

अखंडितपणे साप्ताहिक बापाचा बाप सुरू केले. हळूहळू भिवंडी, ठाणे जिल्ह्यामध्ये प्रत्येक नागरिकाच्या मनामध्ये बापाचा बाप या साप्ताहिकाने विश्र्वास निर्माण केला

आणि हे वर्तमानपत्र नावा रूपाला येऊ लागलं. या साप्ताहिकाचे विशेष म्हणजे संपादकीय लेखन विविध विषयाला अनुसरून आणि अभ्यासपूर्ण होते. संपादिका रेणुका चव्हाण यांनी आपल्या लेखणीतून सातत्याने समाजप्रबोधनासाठी, परिवर्तनासाठी आपली लेखणी झिजवली. बापाचा बाप या साप्ताहिकाच्या संपादिका रेणुका संतोष चव्हाण या एक अधिस्वीकृतीधारक पत्रकार होत्या.

एका यशस्वी पुरुषाच्या मागे एका स्त्रीचा हात असतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे रेणुका चव्हाण आणि संतोष चव्हाण या उभयतांची जोडी. या राजा - राणीच्या जोडीने आपला सुखी संसारच फुलवला नाही तर आपले सामाजिक दायित्वही प्रामाणिकपणे आपले कर्तव्य समजून रेणुका संतोष चव्हाण यांनी पार पाडले. स्त्रीचे उद्धारक फुले, शाहू आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरित होऊन महामानवांच्या विचारांचा वारसा प्रत्येक समाजापर्यंत पोहचावा यासाठी बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडियाच्या माध्यमातून एक उपासिका ते केंद्रीय शिक्षिका म्हणून काम करून आपले सामाजिक अनमोल योगदान देत पुरोगामी विचार आपल्या वृत्तपत्र बापाचा बाप मध्ये निर्भीडपणे अखंडित मांडले. शिक्षणाचे महत्त्व जाणून आपल्या दोन्ही मुलांना मेडिकलचे (डॉकटर) उच्च शिक्षण देऊन समाजालाही प्रेरित केले. त्यांच्या पश्र्चात पती पालिका कामगार नेते संतोष चव्हाण ,मुलगा व मुलगी असा परिवार आहे.

महामानवांचे विचार घराघरात पोहोचविण्यासाठी समाजाचे प्रबोधन व परिवर्तन होण्यासाठी साप्ताहिक बापाचा बाप मधून आपल्या लेखणीच्या माध्यमातून अन्याय - अत्याचारावर त्यांनी प्रहार केला.

कधीही न डगमगता आपल्या पतीच्या जोडीला खांद्याला खांदा लावून त्यांनी वर्तमानपत्रासाठी काम केले आणि बापाचा बाप हे साप्ताहिक नावारूपाला आणले. महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले या दाम्पत्यानी स्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. त्यांचाच एक आदर्श घेऊन संपादिका रेणुका चव्हाण यांनी आपल्या पतीला संकटात वेळोवेळी साथ दिली आणि त्यांचा संसार गुलाबाच्या फुलाप्रमाणे फुलविला. कार्यकारी संपादक संतोष चव्हाण आणि संपादिका रेणुका चव्हाण यांनी मुलगा प्रतीक अणि मुलगी प्रज्ञा या दोघांना परदेशी शिक्षणासाठी पाठवले. आपल्या दोन्ही मुलांना डॉक्टर बनवण्याचे स्वप्न उराशी बाळगून ते परदेशी रवाना झाले. आपल्या दोन्ही मुलांमध्ये त्यांचं अतिशय प्रेम. रेणुका संतोष चव्हाण विविध सामाजिक, धार्मिक ,शैक्षणिक कार्यक्रमात त्यांची हजेरी असायची. मनाने अगदी प्रेमळ अणि मनमिळाऊ स्वभावाच्या होत्या. फुले, शाहू आंबेडकरी चळवळीचे वर्तमानपत्र कोणते आणि त्याचे संपादक कोण?तेंव्हा नक्कीच साप्ताहिक बापाचा बाप संपादिका यांचं नावं आवर्जून लिहावं लागेल म्हणजेच रेणुका संतोष चव्हाण...

महिलांनी लिखाण करावं ,समाजाचे प्रबोधन करावं त्या प्रबोधनातून परिवर्तन घडावं अणि असेच प्रबोधन साप्ताहिक बापाचा बाप संपादिका रेणुका संतोष चव्हाण अपल्या लेखणीतून सातत्याने करीत होत्या. दरवर्षी साप्ताहिक बापाचा बाप वर्धापन दिन असतो. आणि त्या वर्धापन दिनानिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान संपादित रेणुका संतोष चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आला आहे. नात्यात त्यांनी सामाजिक बांधिलकी जपत आपुलकी जिव्हाळा त्यांनी निर्माण केला होता.

'शासनमान्य साप्ताहिक बापाचा बाप' हे वर्तमानपत्रवर्ष २०११ पासून आपल्या वाचनात येत आहे. 'बापाचा बाप' हे साप्ताहिक १४ व्या वर्षामध्ये पदार्पण करीत आहे.आजपर्यंत उत्तम आणि रोखठोक व निर्भीडपणे पत्रकारिता करून सामाजिक बांधिलकी जपून शैक्षणिक, सांस्कृतिक वारसा जपूननागरिकांचे प्रबोधन आणि परिवर्तन व्हावे म्हणून शिव, फुले, शाहू, आंबेडकरी विचारांवर चालणारे, भ्रष्टाचा-यांचा पुराव्यनिशी खुलेआम भांडाफोड करणारे एकमेव शासनमान्य मराठी साप्ताहिक प्रगतीवर नेण्याचे कार्य करत आहे.

लेखणीच्या माध्यमातून विविध विषयांवर लिखाण करून, समाजप्रबोधनाचा वसा हाती घेतला असून, सतत अन्यात अत्याचाराला वाचा फोडण्याचे काम व गरीब, वंचित, नागरिकांचा आवाज साप्ताहिक ''बापाचा बाप'' बनला आहे. संपादिका रेणुका चव्हाण व कार्यकारी संपादकसंतोष चव्हाण यांनी सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत महत्त्वाचेयोगदान दिल्याबद्दल त्यांच्या कार्याची दखल घेऊनलोकधारा प्रतिष्ठान'' ट्रस्ट च्या वतीने''लोकधारा प्रतिष्ठान'' ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मिलिंद सुरेश जाधव, ज्येष्ठसामाजिक कार्यकर्ते बि. के. गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते कृष्णा गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते किशोर सावंत यांच्या हस्ते साप्ताहिक 'बापाचा बाप 'वर्तमानपत्राच्या संपादिका रेणुका संतोष चव्हाण व कार्यकारी संपादक संतोष जानू चव्हाण यांना मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले होते.

कालांतराने अचानक संपादिका रेणुका संतोष चव्हाण यांची प्रकृती बिघडली. पती संतोष चव्हाण यांनी खाजगी रुग्णालयामध्ये त्यांना दाखल केले. जशी लहान मुलांची आई-वडील काळजी घेतात त्याचं प्रमाणे पती संतोष चव्हाण आपल्या पत्नीची काळजी वेळोवेळी घेत होते. त्यात त्यांची दोन्ही मुलं परदेशी शिक्षणासाठी होते. आपल्या आईची विचारपूस वडील संतोष चव्हाण यांच्याकडे करत होते. मुलगा प्रतीक व मुलगी प्रज्ञा या दोघां मुलांमध्ये अतिशय आपल्या आई-वडिलांचे प्रेम.

कालांतराने पुढे प्रकृती हळूहळू अजून खालावत गेली. संतोष चव्हाण यांनी आपल्या पत्नीला वाचविण्यासाठी दिवसरात्र त्यांची काळजी घेत होते. शेवटी २९ जानेवारी २०२४ रोजी सायंकाळी त्यांची प्राणज्योत मावळली. आणि चव्हाण कुटुंबीयांवरती दुःखाचा डोंगर कोसळला.

समाजामध्ये कित्येक संपादक होतात पण चळवळीशी नाळ जोडलेली ही संपादिका समाजामध्ये वावरत असणारी एक आदर्श महिला संपादिका, समाजाने या महिला संपादक म्हणून ज्या व्यक्तीचा आदर्श घ्यावा ती व्यक्ती म्हणजेदिवंगत. रेणुका संतोष चव्हाण.

नातेवाईकांमध्ये, समाजामध्ये माणुसकीचा गोडवा रेणुका संतोष चव्हाण यांनी निर्माण केला होता. प्रत्येकाची विचारपूस करणारी ही व्यक्ती. सर्वांना मायेने साद घालणारी ही व्यक्ती. सर्वांशी प्रेमानं वागणारी ही व्यक्ती होती. रुबाबदार राहणीमान बोलण्यात रोखठोक, नेहमीच हसरा असणारा चेहरा आजही डोळ्यासमोर येतो. झुंजार संपादिका दिवंगत.रेणुका संतोष चव्हाण यांना भावपूर्ण आदरांजली.

कार्य तुमचे पाहून
आज सर्व फुले वाहतील...
विचार तुमचे जिवंत
संपादकीय मधून राहतील...

**लेखक - कवी, पत्रकार -**
**मिलिंद सुरेश जाधव पडघा - भिवंडी**
**मो.८६५५५६९४३६**

पान १ वरुन

## पूर्व प्राथमिक ते चौथीपर्यंतचे वर्ग ..

बऱ्याचदा अध्ययनासाठी आवश्यक असणारा उत्साह कमी असलेला दिसून येतो. ज्याचा नकारात्मक परिणाम त्यांच्या अध्ययनावर होतो. मोसमी हवामान, विशेषतः हिवाळा व पावसाळा या ऋतूमध्ये सकाळी लवकर उठून शाळेत जाणे, पावसामुळे व थंडी मुळे अनेक विद्यार्थ्यांना त्रास होऊन ते बहुदा आजारी पडतात. सकाळी पाल्याला लवकर तयार करणे, जेवणाचा डबा तयार करणे आणि पाल्याला वेळेत शाळेत सोडणे यामुळे देखील अनेक पालकांची ओढाताण होते. सकाळी लवकर भरणाऱ्या शाळेतील विद्यार्थ्यांना बस व व्हॅनद्वारे नेताना रस्त्यावरील धुके, पाऊस यामुळेही अडचणी निर्माण होतात.

यानुसार शाळेच्या वेळेत बदल करताना शहरातील शासकीय व निमशासकीय कार्यालयाच्या वेळा व शाळांच्या वेळा समांतर येणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक असून शाळांच्या वेळेत बदल करताना दोन सत्रामध्ये भरणाऱ्या शाळांनी नियोजन करताना किमान प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी दुसऱ्या सत्राचा विचार करावा, अशी सूचनाही करण्यात आली आहे.

या परिस्थितीचा विचार करता सकाळी नऊ पूर्वी भरणाऱ्या राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळांनी पूर्व प्राथमिक ते चौथी पर्यंतचे वर्ग भरविण्याच्या वेळेत बदल करणे आवश्यक होते. यासाठी स्थानिक परिस्थितीचा विचार करून सकाळी नऊ किंवा नऊ नंतर राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या पूर्व प्राथमिक ते इयत्ता चौथी पर्यंतचे वर्ग भरविण्याबाबत या सूचना निर्गमित करण्यात आल्याचे परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे.

## पुणे चक्राकार मार्गामुळे विकासाच्या

अंतर कमी होऊन वाहतुकीचे प्रश्न सुटणार आहे.

पुणे शहरात २४ द ७ पाणी पुरवठा योजना, नदी सुधार कार्यक्रम यासारख्या विविध प्रकारच्या योजना राबवून विकास कामांच्या माध्यमातून शहराचे चित्र बदलण्याचे काम सुरु आहे. पीएमपीएलच्या माध्यमातून देशातील पहिली इलेक्ट्रीक बसची फ्लिट पुणे शहरात केली आहे. पुण्याचे या मॉडेलची देशात अंमलबजावणी करण्यात येत असून विविध शहराने ते स्वीकारले आहे. मेट्रोचे कामे अतिशय गतीने करण्यात येत आहे. सिव्हील कोर्ट ते स्वागेट मेट्रोचे मुठा नदीच्या गर्भातून भुयारी चाचणी घेण्यात आली असून येत्या काळात मेट्रोचे तीन्ही मार्ग मिळून एकूण ५४ कि.मीचे मेट्रोचे जाळे सुरु करण्यात येत आहे. येत्या वर्षभरात टाटाच्या मेट्रोचे काम पूर्ण करण्यात येणार आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर सौदर्यीकरण आणि ससून रुग्णालय चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांकरीता अतिशय अद्ययावत प्रकारचे निवासस्थान तयार करण्यात येत आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून शेवटच्या माणसाचा विचार केला असून त्याच विचाराला अनुसरून चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना राहण्याची व्यवस्था होत आहे. महात्मा गांधी पूलगेट बसस्थानकाचा नीट नियोजन करत सर्वांगिण गरजांचा विचार करुन आराखडा तयार करण्यात आला आहे. संगम घाट येथील निवारा केंद्र आणि गणेश विसर्जनाचे नुतनीकरण तसेच छत्रपती संभाजी महाराज बॉटनिकल गार्डन तयार करण्यात येत आहे. विविध विकास कामांच्या माध्यमातून पुणे कॅन्टोन्मेंटमट विधानसभा मतदारसंघात बदल होतांना दिसून येत आहे.

पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघात संरक्षण विभागाचा भाग असल्याने निर्बंध असून महानगरपालिका आणि शासनाला विकास करतांना समस्या निर्माण होत आहे. महानगरपालिकेप्रमाणे दिल्या जाणाऱ्या वस्तु व सेवाकर स्वरुपात परतावा दिला जातो त्याप्रमाणे कॅन्टोन्मेंट मंडळाला निधी मिळण्याबाबत पाठपुरावा करण्यात येईल. महानगरपालिका क्षेत्रातील योजना कॅन्टोन्मेंट मंडळाला लागू करण्याबाबत येत्या काळात पुणे महानगरपालिका, नगर विकास विभाग आणि सर्व संबंधित विभागासोबत बैठक घेण्यात येईल, अशा कॅन्टोन्मेंट मंडळातील प्रलंबित विकास कामे मार्गी लावण्यात येतील, अशी ग्वाही त्यांनी दिली.रेल्वेच्या जमिनीवर एसआरएअंतर्गत झोपडपट्टीधारकांना घरे बांधण्यासाठी त्यांचे पुनर्वसन करण्याकरीता जागा उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केली आहे. त्याबदल्यात रेल्वे विभागाला इतरत्र राज्य शासनाची जमीन देण्यात येईल किंवा मोबादला देण्यात येणार आहे. यामुळे झोपडपट्टीधारकांचा घरांचा उपलब्ध होईल तसेच अतिक्रमणाचा प्रश्र्न मार्गी लागेल. याबाबत भारत सरकार सकारात्मक असून येत्या काळात निर्णय होण्याची अपेक्षा आहे. रहिवाशांच्या प्रश्र्नाबाबत केंद्र सरकार सोबत चर्चा करुन मार्गच काढण्यात येईल, असे आश्र्वासन श्री. फडणवीस यांनी दिले.

मंत्री श्री. पाटील म्हणाले की, गेल्या दीड वर्षात राज्यातील विकासाला गती मिळाली असून राज्यासह पुण्यातील अनेक पायाभूत सुविधांचा विकास शासनाने केला आहे. लहुजी वस्तादांच्या स्मारकाचे काम लवकरच पूर्ण करण्यात येईल असे सांगून ससून रुग्णालयातील कर्मचाऱ्यांसाठी बांधलेल्या निवासाच्या इमारती व पुणे स्टेशन परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा परिसरातील सुशोभीकरण ही कामे महत्त्वपूर्ण असल्याचे मंत्री श्री. पाटील यांनी सांगितले.

आमदार श्री. कांबळे म्हणाले की, पुणे कॅन्टोन्मेंट मतदार संघाच्या विकासासाठी शासनाने गेल्या दीड वर्षात ९० कोटी रुपये निधी उपलब्ध करुन दिला आहे. केंद्र सरकारने कॅन्टोन्मेंटचे महानगरपालिकेकडे विलीनीकरण करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. त्याप्रमाणे कॅन्टोन्मेंट भागातील नागरिकांना न्याय मिळेल, असे श्री. कांबळे म्हणाले. माजी मंत्री श्री.कांबळे यांनीही यावेळी विचार व्यक्त केले.

## जयंत पाटील यांच्याकडून.

पवार गटाकडून फसवून प्रतिज्ञापत्र घेतल्याचा आरोप केला होता. त्यामुळे या सर्व पार्श्र्वभूमीवर जयंत पाटील यांनी त्यांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब केलं आहे. दुसरीकडे, अजित पवारांनी अमोल कोल्हेंविरोधात थेट दंड थोपटले आहेत. अमोल कोल्हेंना निवडून आणण्यासाठी जीवाचं रान केलं, पण यावेळी पाडणार म्हणजे पाडणारच, असं म्हणत अजित पवारांनी अमोल कोल्हेंना थेट आव्हान दिलं आहे. यानंतर अजित पवार यांना कोल्हे यांनी सुद्धा प्रत्युत्तर देत डिवचले होते. सरकार सोडवू न शकलेल्या समस्या मी शेतकरी आक्रोश मोर्चातून मांडत आहे. त्यामुळं अजित दादांची चिडचिड होते का? हे तुम्ही त्यांनाच विचारा. असं म्हणत कोल्हे यांनी बारामती विधानसभेतील शेतकऱ्यांच्या प्रश्र्नांचा पाढा वाचलवा होता. सत्ता संघर्षवेळी जनता आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी सत्तेत गेल्याचं ते म्हणाले. ते मंत्री झाल्यावर त्यांचं जेसीबीतून पुष्पवृष्टी करत जंगी स्वागत झालं. पण आता मात्र त्यांना शेतकऱ्यांचा विसर पडला. म्हणूनच शेतकरी मला कांदा, खर्डा-भाकरी देऊन साधपणाने स्वागत करतायेत अन त्यांचे प्रश्र्न मांडायला साथ देतायेत, असं कोल्हे यांनी म्हटले होते.

## तीन गोळ्या थेट शरिरात घुसल्याने

गोळ्या घोसाळकरांच्या शरिरात घुसल्या होत्या.

मॉरिस नावाचा इसम दहिसर- बोरिवली परिसरात स्वयंसेवी संघटना चालवत असल्याची माहिती आहे. स्थानिक राजकीय वर्तुळात मॉरिस नावाच्या व्यक्तीला स्वयंघोषित नेता म्हणून ओळखले जायचे. गणपत पाटील नगरमध्ये मॉरिस काम करत होता.

मॉरिस नावाच्या व्यक्तीने हा गोळीबार पैशाच्या व्यवहारातून केला असल्याचं समोर आलं आहे. वर्षभरापूर्वी त्यांच्यामध्ये वाद झाला होता. पण आता तो मिटल्याने ते एकत्र आले होते. मॉरिसने अभिषेक घोसाळकरांना गोळ्या घालत नंतर स्वतःवरही गोळी झाडून घेतली. मॉरिस नावाच्या व्यक्तीने घोसाळकरांना त्याच्या कार्यालयात बोलावलं होतं. त्यानंतर या दोघांनीही फेसबुक लाईव्ह केलं आणि यापुढे एकत्र काम करण्याचं ठरवलं. शेवटच्या क्षणी मॉरिस नोरवा हा व्हिडीओतून बाजूला झाला आणि त्याने समोरून गोळीबार केला. त्यात अभिषेक घोसाळकर यांची प्रकृती गंभीर बनली.

## आरबीआयचे पतधोरण जाहीर

सावध असले पाहिजे. वाढत्या भू-राजकीय तणावामुळे पुरवठा साखळींवर परिणाम होत आहे आणि वस्तूंच्या किमतींवर, विशेषत: कच्च्या तेलाच्या किमतींवर दबाव येत असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. आरबीआयने फेब्रुवारी २०२३ मध्ये रेपो रेटमध्ये वाढ केली होती. त्यावेळी रेपो दर ६.५० टक्के एवढा होता. तो अद्याप जैसे थे ठेवला आहे. एप्रिल, जून, ऑगस्ट, ऑक्टोबर आणि डिसेंबरमधील पाच बैठकांमध्ये आरबीआयने रेपो रेट ६.५० टक्के कायम ठेवला होता. आता पुन्हा सहाव्यांदा त्यात कोणताही बदल केलेला नाही देशाची अर्थव्यवस्था येत्या काही वर्षांत सुमारे सात टक्क्यांनी वाढण्याची शक्यता आहे आणि पुढील तीन वर्षांत ती जीडीपी पाच ट्रिलियन डॉलरसह जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याची अपेक्षा आहे.

## मातोश्री रमाईच्या त्यागाचा संघर्ष स्त्रियांसाठी आदर्श निर्माण करतो

ईटखेडा : महान कार्य करणाऱ्या व्यक्तिमत्त्वाच्या मागे एका चांगल्या गुणी स्त्रीचा हात असतो हे खरे आहे, असाच त्याग आणि प्रेम रमाई आंबेडकर यांचा डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना घडण्यासाठी, त्यांच्या हातून समाजाला घडविण्यासाठी होता. रमाईचा संघर्ष हा पतीच्या शिक्षणासाठी, समाजाच्या कल्याणासाठी, जगाच्या उध्दारासाठी, मानवाच्या कल्याणासाठी होता, रमाईने अपार दु:ख, दयनीय अवस्था सहन करुन एक नवा इतिहास घडविला. तो इतिहास म्हणजेच रमाई आंबेडकर यांचा त्याग आहे. त्या त्यागाचा आदर्श आजच्या सर्व महीलांनी घ्यावा. म्हणून मातोश्री रमाईच्या त्यागाचा संघर्ष स्त्रियांसाठी आदर्श निर्माण करतो. असे मार्मिक व वास्तववादी प्रतिपादन आंबेडकरवादी साहित्याचे अभ्यासक, विचारवंत व कवी प्रा. मुन्नाभाई नंदागवळी यांनी केले. ते रमाई आंबेडकर यांच्या जन्मोत्सव या कार्यक्रमाचे मुख्य प्रबोधनकार व मार्गदर्शक म्हणून बोलत होते.



यावेळी विचार मंचावर इटखेडा जिल्हा परिषद क्षेत्राच्या सदस्या पोर्णिमा ढेंगे यांनी दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन केले. तर पंचायत समिती सदस्या भाग्यश्री सयाम यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख मार्गदर्शक व प्रबोधनकार म्हणून मुन्नाभाई नंदागवळी, साहिल रामटेके तुळशी, गावातील सरपंचा आशा झिलपे, ग्रामपंचायत सदस्य छाया लोणारे, उज्वला गोंडाणे, वर्षा कावळे, छाया धांडे, सीमा कोटरंगे आदी मंचावर प्रामुख्याने उपस्थित होते.

मंचावरील काही मान्यवरांनी आपली मत मांडली. विचार व्यक्त करताना प्रा. नंदागवळी पूढे म्हणाले- रमाई आंबेडकर म्हणजे दुःखमय कष्ट उपसणा-या महामाता होत. गोव-या थापल्या, सरपण आणल्या, स्वतः च्या मुलांना गरिबीच्या खस्ता खात वाचवू शकली नाही, असा अतिशय वेदनादायी जीवनाचा प्रवास करताना पतीला या जगाचा बाबासाहेब बनविला आणि रमाईच्या परिश्रमाचे फळ आहे. अशाप्रकारे अतिमहत्त्वाचे विधान या वेळी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंजूषा गोंडाणे व पोर्णिमा डोंगरे यांनी केले तर आभार दर्शना गोंडाणे यांनी मानले. यशस्वीतेसाठी आनंद बुद्ध विहार समिती, युथ सामाजिक समिती, भिमाई महीला मंडळ, रमाई महिला मंडळ व बौध्द समाज दीक्षाभूमी इटखेडा यांनी खूप परिश्रम घेतले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# स्वेरीत 'वर्किंग ऑफ ड्रोन्स अँड ड्रोन टेक्नॉलॉजी' या कार्यशाळेचे उदघाटन

पंढरपूर/प्रतिनिधीः 'ड्रोन चा कृषी क्षेत्रामध्ये विशेषतः शेतीच्या फवारणी, पाहणी व आदी शेती संबंधित प्रत्येक कार्यात सर्रास वापर केला जात आहे. त्यामुळे भविष्यात ड्रोनचा कृषी क्षेत्राबरोबरच विविध क्षेत्रातही वापर वाढणार आहे. अलीकडच्या काळात संशोधन क्षेत्रात भरारी मारत असताना स्वेरी मध्ये ड्रोन तंत्रज्ञानाला ऊर्जा मिळत आहे.' असे प्रतिपादन बेंगलुरू येथील जनरल अॅरोनॉटिक्स प्रायव्हेट लिमिटेडचे विभागीय व्यवस्थापक एस. थिरुमलाई यांनी केले.

गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या वतीने 'वर्किंग ऑफ ड्रोन्स अँड ड्रोन टेक्नॉलॉजी' या विषयावर दि.०६ फेब्रुवारी ते दि.११ फेब्रुवारी २०२४ अशा तब्बल आठवडाभर चालत असलेल्या कार्यशाळेच्या उदघाटन प्रसंगी विभागीय व्यवस्थापक एस. थिरुमलाई हे मार्गदर्शन करत होते. दीपप्रज्वलनानंतर प्रास्ताविकामध्ये डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.एन.डी. मिसाळ यांनी 'ड्रोन टेक्नॉलॉजी'चे सध्याचे महत्त्व व ड्रोनपासून ते ड्रोन तंत्रज्ञानावर होत असलेल्या संशोधनाविषयी माहिती दिली. संशोधन विभागाचे अधिष्ठाता डॉ. अमरजित केने यांनी 'महाराष्ट्र शासनाच्या राजीव गांधी सायन्स अॅन्ड टेक्नॉलॉजी कमिशन (आर.जी.एस.टी.सी.) कडून ड्रोन तंत्रज्ञानावर आधारित बहु-संस्थात्मक संशोधन प्रस्तावास सुमारे रु.३४ कोटी रुपयांचा संशोधन निधी मंजुर करण्यात आला असून या संशोधन प्रस्तावात इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी, मुंबई, वीरमाता जिजाबाई टेक्नॉलॉजीकल इन्स्टिट्यूट, मुंबई व स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर या तीन संस्थांचा समावेश असून या निधीवरच हे ड्रोन संशोधन प्रकल्प साकार होत आहेत.' असे सांगून त्यांनी आठवडाभर आयोजिलेल्या उपक्रमांची माहिती दिली. प्रमुख पाहुणे एस. थिरूमलाई यांनी पुढे 'ड्रोन तयार करण्यासाठी लागणारा कालावधी, एकूण खर्च, याची क्रिया नेमकी कशी चालते, वजन क्षमता, ड्रोनची वजन मर्यादा, होणारा उपयोग, ड्रोन कसे उडवायचे?, मल्टी रोटर, फिक्सिंग हायब्रीड' यासंबंधीची माहिती दिली. पुढे त्यांनी 'व्हिडिओ व फोटोग्राफी मध्ये केला जाणारा ड्रोन चा वापर, ड्रोन चे नॅनो, मायक्रो, लहान, मध्यम व मोठे असे प्रकार, त्यांचे वजन व विविध आकार' याबाबत खुलासा केला. त्यानंतर 'प्रत्येक ड्रोनची टेक्नॉलॉजी एकच असली तरी याचे स्वतंत्रपणे प्रशिक्षण घ्यावे लागते. ड्रोनचा वेग व दिशा यावर रोटर च्या साह्याने नियंत्रण करता येते. ड्रोनचे विविध भाग त्याचे कार्य, स्पीड कंट्रोलर, ब्रश कंट्रोलचे कार्य,

त्यावर असणाऱ्या बॅटरीची क्षमता, ड्रोनवर असणारे पाते (ब्लेड) त्याची क्षमता ट्रान्समीटर, रिसिव्हर, फ्लाईट कंट्रोल' आदी बाबत माहिती दिली. 'आपण नियोजित केलेल्या ठिकाणापासून पाचशे मीटर अंतरा दरम्यान रेंजद्वारे ड्रोनचे कार्य




चालते तर आकाशात ३० मीटर उंचीपर्यंत ड्रोनवर जाऊ शकते.' असे सांगून विभागीय व्यवस्थापक एस. थिरुमलाई यांनी ड्रोन विषयी अधिक सविस्तर माहिती दिली. यावेळी स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या भव्य मैदानावर या ड्रोनचे विविध प्रकारे प्रात्यक्षिक दाखवले गेले. यावेळी प्रशासन अधिष्ठाता डॉ. आर.आर.गिड्डे, डॉ. मिनाक्षी पवार, डॉ. मोहन ठाकरे आदी प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी आदी उपस्थित होते. स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली ड्रोन वरील संशोधन कार्य सुरू असून यात शैक्षणिक अधिष्ठाता डॉ.प्रशांत पवार प्रा. रविकिरण जाधव, उत्तम यलमार, भाग्यश्री देशमुख, प्राजक्ता सूर्यवंशी, सागर कदम व इतर सहकारी या ड्रोन प्रकल्पासाठी परिश्रम घेत आहेत. प्रा. नितीन कौटकर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

# रमाईचे जीवन म्हणजे एक महाकाव्य होय : प्रा.डी.डी.मस्के

वागदरी/एस.के.गायकवाड :त्यागमुर्ती महामाता रमाई आंबेडकर यांचे जिवन म्हणजे एक महाकाव्य होय असे प्रतिपादन आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ विचारवंत कार्यकर्ते प्रा.डी.डी.मस्के यांनी बार्शी येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना केले.



दि ७ फेब्रुवारी२०२४ रोजी नालंदा बुद्ध विहार बार्शी (जिल्हा सोलापूर ) येथे त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांची १२६ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ धम्मसेविका पुष्पाताई ओमन ह्या होत्या तर प्रमुख व्याख्याते म्हणून प्रा.डी.डी.मस्के हे होते.

या प्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून बोलताना त्यांनी माता रमाईचा त्याग सांगून सामर्थ्यवान,प्रेरणादायी,समर्थ साथ देणारी, संसार सांभाळणारी, कष्टाळू, आदर्श माता, आदर्श बहीण, आदर्श सून, आदर्श सहचारिणी, कुटुंबवत्सल असे रमाईचे गुण वैशिष्ट्ये दिसून येतात यावरून रमाईचे जीवन म्हणजे एक महाकाव्य होय असे विचार व्यक्त केले. पुढे बोलताना ते म्हणाले की या महामातेंनं महासूर्याचा संसार चालवताना रमा भीमाच्या दिव्याची वात झाली. हा दिवा न विझणारा, अन वातही न संपणारी आहे. हा दिवा सतत तेवत ठेवण्याची जबाबदारी सर्व बहुजन बांधवाची आहे. रमाईच्या चारित्र्यातून बहुजनासाठी संयम, श्रमसंस्कार, प्रामाणिकपणा, स्वाभिमान हे गुण दिसून येतात. तरी त्यांचा विचारांचा आपण सर्वांनी अंगीकार केला पाहिजे. असे आवाहन प्रा.डी.डी. मस्के यांनी केले.

या कार्यक्रमाला सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी विष्णू कांबळे, प्रा.ए.बी. विद्यागर,भीमराव कदम सर,नागनाथ सोनवणे सर,रमेश निकुंबे, अस्तम चंदनशिवे,प्रा.अशोक वाघमारे, बुध्दसेवा ट्रस्ट च्या सर्व सदस्या, नालंदा बुधविहाराच्या सर्व सदस्या उपस्थित होत्या.

यावेळी बुध्दसेवा ट्रस्टच्या पुष्पाताई ओमन, सुजाता गायकवाड, शोभा मोरे,शैलताई कांबळे, जनाबाई लोकरे, तसेच शिवशक्ती अर्बन बँकेचे नवनियुक्त व्हाईस चेअरमन प्रा.अशोक वाघमारे, तुळजापूर नगरपालिकेचे उपमुख्यधिकारी रणजित कांबळे, बार्शी पंचायत समितीच्या कृषिधिकारी सारिकाताई लोकरे,आदींचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी स्त्री-पुरुष कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा

सोलापूर/प्रतिनिधीः साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळामार्फत मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील दरिद्रय रेषेखालील व गरजू घटकांचा आर्थिक उन्नतीसाठी, तसेच त्यांना स्वंयरोजगाराच्या अधिअधिक संधी उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. संबधितांनी या महामंडळाच्या योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक आर. एच. चव्हाण यांनी केले आहे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या) मार्फत मांग, मातंग, मिनी, मादीग, दानखणी मांग, मांग महाशी, मदारी, राधेमांग, मांग गारूडी, मांग गोराडी, मादगी व मादिगा या जातीतील लोकांमध्ये शिक्षणाच्या प्रमाणात लक्षणीय वाढ झालेली आहे, परंतू उत्पन्नाच्या साधनाच्या अभावामुळे आर्थिक परिस्थिती असल्याने महामंडळ व राष्ट्रीयकृत बँकेमार्फत विविध योजना राबविण्यात येतात. राष्ट्रीयकृत बँकामार्फत मातंम समाज व तत्सम जातीतील लोकांची व्यवसाय करण्याची पात्रता असूनही कर्ज मंजूर केले जात नाही,

समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), मुंबई व राष्ट्रीय अनुसुचीत जाती वित्त विकास महामंडळ, दिल्ली यांचेमार्फत सुविधा कर्ज योजना-कर्ज मर्यादा रक्कम रु.५.०० लाख, लघु ऋण वित्त योजना-कर्ज मर्यादा रक्कम रु.१.४० लाख, महिला समृध्दी योजना-कर्ज मर्यादा-१.४० लाख व शैक्षणिक कर्ज योजना-कर्ज मर्यादा देशांतर्गत अभ्यासक्रमासाठी- रक्कम रु.३०.०० लाख व परदेशातील अभ्यासक्रमासाठी रक्कम रु.४०.०० लाख याप्रमाणे योजना सुरु करण्यात येणार असून त्यानुसार जिल्हा कार्यालयांना उदृष्टि प्राप्त झालेले आहे. सदर योजनांची माहिती महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.अर्जदारांना येणा-या अडीअडचणींचा विचार करुन महामंडळामार्फत वेबसाईट प्रणाली विकसित करण्यात आली आहे राष्ट्रीय अनुसुचीत जाती वित्त विकास महामंडळ, दिल्ली (NSFDC) योजनांचे अर्ज ऑन लाईन पध्दतीने https://beta.slasdc.org हया वेबसाईट प्रणालीवर सादर करावेत.

महामंडळामार्फत मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील गरजू व होतकरु लोकांनी मुदत कर्ज योजना, लघु ऋण वित्त योजना, महिला समृध्दी योजना, शैक्षणिक कर्ज योजना हया कर्ज योजनांचे लाभ घेण्यासाठी सदरचे अर्ज ऑन लाईन पध्दतीने https://beta.slasdc.org हया वेबसाईट प्रणालीवर सादर करावेत असे आवाहन साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक, श्री. चव्हाण यांनी केले आहे.

# स्वामी कार्या बरोबरच विविधांगी विकासकामे : पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे

अक्कलकोट/प्रतिनिधीः श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली भक्तांनासाठी सुरू असलेल्या स्वामी कार्या बरोबरच विविधांगी विकासकामे ही उल्लेखनीय असून, येथे सकारात्मकता पहायला मिळत असल्याचे मनोगत उत्तर पोलीस ठाण्याचे नूतन पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे यांनी व्यक्त केले.




ते तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आले असता न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. त्यांच्या समवेत उत्तर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश बागाव, पो.ना.चिदानंद उपाध्याय, केदार सुतार, आनंदराव कुंभार हे उपस्थित हेते. याप्रसंगी न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, विश्र्वस्त भाऊ कापसे, मनोज निकम, पुरोहित विश्र्वंभर पुजारी, निखिल पाटील, वैभव नवले, पिंटू दोडमनी, सर्फराज शेख, अतिष पवार, राहुल डिंगगे एस.के.स्वामी, बाळासाहेब पोळ, सौरभ मोरे, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, बाळासाहेब घाडगे, गोटु माने, दत्ता माने, शावरेप्पा माणकोजी, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# शहापूर तालुक्यातील वासिंद येथे रणरागिणी जयंती महोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न

शहापूर/विजय घनघाव :भविष्यातील आगामी पिढीला इतिहासातील थोर मातांचे महत्त्व कळून यावे.. त्यांचा इतिहास माहित व्हवावा आणि त्यांचे गुणगान पुढे सुद्धा गात राहिले पाहिजे अशा थोर उद्देशाने शहापूर तालुक्यातील वासिंद येथे रणरागिणी जयंती महोत्सव पार पडला..




वासिंद पूर्व मधील रणरागिणी महिला ग्रुप यांच्या वतीने दोन दिवसीय माता जिजाऊ,माता सावित्रीबाई फुले व माता रमाई यांच्या जयंती महोत्सव कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

पहिल्या दिवसाच्या कार्यक्रमात वासिंद मधील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या व ग्रामपंचायत वर सदस्या म्हणून निवडून गेलेल्या रणरागिणी यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

दुसऱ्या दिवशी मोठ्या उत्साहात व जल्लोषात रणरागिणी यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली.आंबेडकर चौक ते मुख्य बाजारपेठ अशी मिरवणूक काढण्यात आली.

दरवर्षी थोर महात्मे यांची मिरवणूक काढण्यात येते परंतु रणरागिणी यांची नाही,त्यांच्या प्रति आदरभाव व प्रेरणा मिळावी या उद्दात भावनेने हा जयंती महोत्सव साजरा करण्यात आला आहे असे रणरागिणी ग्रुपच्या संगीता गांगुर्डे यांनी प्रास्ताविकात सांगितले.

या सोहळ्यासाठी प्रमुख अतिथी म्हणून पूनम हिलम,सरस्वती विद्यालयाच्या मुख्याध्यापिका मीना कांबळे, राष्ट्रीय विरता पुरस्कार प्राप्त हाली बरफ, सरपंच राजेंद्र म्हसकर,रमाई महिला मंडळ अध्यक्षा आशाताई जाधव, रणरागिणी ग्रुप अध्यक्षा शांताबाई घोडेस्वार उपस्थित होते तर विविध क्षेत्रातील मान्यवर यांनी आपली उपस्थिती दर्शविली.या कार्यक्रमाच्या निमित्ताने ए फॉर आंबेडकर हा गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाचे निवेदन संजीव जाधव व मुकेश दामोदरे यांनी केले तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रणरागिणी ग्रुप च्या सर्व सदस्यांनी अहोरात्र मेहनत घेऊन सदर कार्यक्रम सादर केला असल्याचे दिसून आले..

# वागदरीत त्यागमुर्ती माता रमाई आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

वागदरी/एस.के.गायकवाड : वागदरी ता.तुळजापूर येथे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यात जीवनाच्या आखेर पर्यंत समर्थपणे साथ देणारी माता रमाई भिमराव आंबेडकर यांची १२६ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.



मातोश्री रमाई आंबेडकर महिला मंडळ व सर्व बौद्ध बांधवांच्या वतीने वागदरी ता.तुळजापूर येथे त्यागमुर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या जयंती निमित्त आभिवादनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यामान सरपंच तेजाबाई शिवाजी मिटकर ह्या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून उपसरपंच मिनाक्षीबाई महादेव बिराजदार,ग्रा.प.सदस्या मुक्ताबाई विलास बिराजदार, बचत गटाच्या अध्यक्षा सिंधूताई बिराजदार, जेष्ठ कार्यकर्ते शिवाजी मिटकर गुरुजी, तंटामुक्त अध्यक्ष राजकुमार पवार आदी उपस्थित होते.

प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, व त्यागमुर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पुजन करून माता रमाईस आभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी बोलताना जेष्ठ समाजिक कार्यकर्ते शिवाजी मिटकर गुरुजी म्हणाले की, भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या एकुणच कार्यात माता रमाईने जिवनाच्या शेवटच्या श्र्वासापर्यंत समर्थपणे साथ दिली. त्यांनी फार मोठा त्याग आपल्या जीवनात आपल्याकरिता केला म्हणूनच माता रमाईला त्याग मुर्ती म्हटले जाते.त्यांचे विचार आणि कार्य भावी पिढीला प्रेरणादायी आहे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक चंद्रकांत वाघमारे यांनी केले तर सुत्रसंचलन रिपाइं (आठवले) चे जिल्हा सचिव तथा पत्रकार एस.के.गायकवाड यांनी केले व आभार प्रदर्शन रमाई महिला मंडळाच्या उज्वला वाघमारे यांनी केले या प्रसंगी क्रषी सखी कोमल झेंडारे यांनी दिवंगत माजी ग्रा.प. सदस्या शकुंतलाबाई झेंडारे यांच्या स्मरणार्थ डॉ.बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई आंबेडकर यांची प्रतिमा महिला मंडळास भेट दिली.

या वेळी माजी सरपंच नागनाथ बनसोडे, सहादेव वाघमारे, उत्तम झेंडारे,मोहन वाघमारे, हणमंत वाघमारे, बाबासाहेब वाघमारे,सुर्यकांत वाघमारे, महिला कार्यकर्त्या गीताबाई झेंडारे, ठकुबाई वाघमारे, शकुंतलाबाई वाघमारे, राधाबाई वाघमारे, स्वाती गायकवाड, श्रीदेवी वाघमारे, कमलबाई धाडवे,माजी उपसरपंच कविता गायकवाड, मुक्ताबाई वाघमारे, वंदनाबाई वाघमारे,अर्चना वाघमारे, सुगंधाबई वाघमारे, रमाबाई महादेव वाघमारे, कविता संदिपान वाघमारे, गेंदाबाई बनसोडे, कांताबाई वाघमारे, विजयाबाई वाघमारे सह महिला,ग्रामस्थ व युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोलापूर येथील रिपाइं च्या जिल्हा मेळाव्यास पंढरपूर तालुक्यातून हजारो संख्येने कार्यकर्ते उपस्थित राहणार



पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पंढरपूर शहर व तालुका यांची जिल्हा मेळाव्यास उपस्थित राहण्यासाठी नियोजन बैठक डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे संपन्न झाली.बैठकीच्या अध्यक्षस्थानी तालुका अध्यक्ष संतोष पवार हे होते.

यावेळी सुनिलजी सर्वगोड राज्य सचिव, जितेंद्र बनसोडे प.महा.सरचिटणीस, बाळासाहेब कसबे प.महा.संघटक,सुरेश शिंदे जि.उपाध्यक्ष, किर्तीपाल सर्वगोड शहर अध्यक्ष, दयानंद बाबर ता.सरचिटणीस, सचिन भोसले ता.कार्यध्यक्ष, विजय वाघमारे ता.कोश्याधक्ष, समाधान बाबर ता.सं.सचिव, ता.उपाध्यक्ष निलेश जाधव,वंशदिप शिंदे,सचिन गाडे श.सरचिटणीस,विजय खरे श.कार्यध्यक्ष, योगेश जाधव युवक ता.अध्यक्ष, विशाल मांदळे युवक श.अध्यक्ष तसेच प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्यातील हातमाग व्यवसायातील हातमाग विणकरांना प्रोत्साहन

सोलापूर/प्रतिनिधीः राज्यातील हातमाग व्यवसायातील हातमाग विणकरांना प्रोत्साहन देण्यासाठी हातमाग विणकर सहकारी संस्था, स्वयंसहाय्यता गट व खाजगी क्षेत्रातील हातमाग विणकरांसाठी हातमाग कापड स्पर्धा व बक्षिस योजना दरवर्षी राबविण्यात येते. सदर कापड स्पर्धेकरीता हातमाग विणकरांनी हातमागावर विणलेल्या पारंपारीक व अपारंपारीक डिझाईनच्या अतिउत्कृष्ट नाविण्यपुर्ण व / कलात्मक वाणाची प्रदर्शीत वाणामधून निवड करुन उत्कृष्ट वाणास प्रोत्साहनपर बक्षिस देवून हातमाग विणकरांला प्रोत्साहन देण्यात येत आहे. त्याअनुषंगाने पारंपारीक व अपारंपारीक वाणाचे कापड उत्पादन करणाऱ्या विणकराकरीता सन २०१६-१७ पासून विभागीय स्तरावर विभागीय हातमाग कापड स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासनाने वरील हातमाग कापड स्पर्धेची पुनर्रचना करुन महाराष्ट्र शासन सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय क्रमांक हातमाग -२०१५/ प्र.क्र.१४/टेक्स-३ दिनांक १७ ऑक्टोंबर २०१६ च्या निर्णयान्वये हि स्पर्धा विभागीय हातमाग कापड स्पर्धा असे नामकरण करुन विभागीय स्तरावर आयोजित करण्याचे निश्र्चित केलेले आहे. प्रादेशिक उपआयुक्त, वस्त्रोद्योग, सोलापूर यांचे अधिपत्याखालील जिल्ह्यासाठी म्हणजे सोलापूर जिल्ह्यासह सांगली, कोल्हापूर, सातारा व पुणे या जिल्ह्यातील प्राथमिक हातमाग विणकर सहकारी संस्था / स्वयंसहाय्यता गट व खाजगी क्षेत्रातील हातमाग विणकरासाठी हातमाग कापड स्पर्धा मा. आयुक्त, वस्त्रोद्योग, महाराष्ट्र शासन, नागपूर यांचे दिशानिर्देशानुसार विभागीय स्तरावर प्रादेशिक उपआयुक्त, वस्त्रोद्योग, सोलापूर त्यांच्यावतीने दिनांक.१३ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय कन्ना चौक रविवार पेठ सोलापूर येथे आयोजित करण्यात येत आहे.

विभागीय हातमाग कापड स्पर्धा करीता पारंपारीक (साड्या, लुगडी, लुंगी, खणावळी, धोतरे इत्यादी) व अपारंपारीक (टॉवेल, चादरी, शर्टींग, कोटींग पडद्याचे कापड, मफलर, शॉल, वॉल हॅगींग इत्यादी) वाणाचे हातमाग विणकरांनी त्यांनी हातमागावर उत्पादन केलेले कलात्मक व नाविण्यपुर्ण हातमाग विणकर सहकारी संस्था, स्वयंसहाय्यता गट व खाजगी विणकराकडून प्राप्त झालेल्या वाणाचे दिनांक. १३/०२/२०२४ रोजी आयोजित केलेल्या स्पर्धेत प्रदर्शीत करण्यात येवून त्यामधून विभागीय हातमाग कापड निवड समिती मार्फत उत्कृष्ट वाणाची निवड करण्यात येणार आहे. सदर स्पर्धा कार्यक्रमास हातमाग व्यवसायाशी संबंधीत हातमाग विणकरांना उपस्थित राहता येईल. तसेच स्पर्धेसाठी उत्पादनाचे वाण सादर केलेल्या विणकरांना या कार्यक्रमास न चुकता हजर राहणे आवश्यक आहे.

विभागीय हातमाग कापड स्पर्धेत सहभाग घेवून प्रदर्शीत केलेल्या वाणामधून प्रथम पारितोषीक रु. २५,०००/-, द्वितीय २०,०००/- व तृतिय बक्षिस १५,०००/- प्रमाणे पारितोषीक जाहिर करुन हातमाग विणकरांना समारंभाच्या वेळी प्रशस्तिपत्रकासह देण्यात येणार आहे.

तरी सदर विभागीय हातमाग स्पर्धेकरीता हातमाग सहकारी संस्था, स्वयंसहाय्यता गट व खाजगी क्षेत्रातील हातमाग विणकरांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याकरीता प्रादेशिक उपआयुक्त, वस्त्रोद्योग, सोलापूर चंद्रकांत टिकुळे, यांनी आवाहन केले आहे.

# बोळेगाव तेथे माता रमाई जयंती साजरी



वागदरी/प्रतिनिधीः तुळजापूर तालुक्यातील बोळेगाव येते माता रमाई आंबेडकर यांची १२६ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. येथील भिमनगर येथे समस्त बौद्ध बांधवांच्या व ग्रामस्थांच्या वतीने महामाता रमाई आंबेडकर यांच्या जयंती निमित्त आभिवादनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रारंभी सरपंच विलास यशवंत पाटील यांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पुजन करून आभिवादन करण्यात आले. यावेळी ग्रा.प.सदस्य अंकुश रुपनूर, रामलिंग गायकवाड, तमाण्णा बनसोडे,पंडीत भोसले,सोपान जगताप,संजय कांबळे लिंबारी गोपिळे,बाळू कांबळे,प्रमोद बनसोडे,आलेस गायकवाड, गणेश गायकवाड,ज्ञानेश्र्वर सुरवसे,अशोक सुरवसे,मोहन गोपाळे,आभिषक सुरवसे,साईनाथ बनसोडे, चंद्रकांत कांबळे, संगीता सुरवसे सह बौद्ध उपासक उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सुसज्ज कार्यालयात नागरिकांना सुलभ व तात्काळ सेवा उपलब्ध होईल



पंढरपूर/प्रतिनिधीः सार्वजनिक बांधकाम विभागाची कार्यालय ही चांगली व सुसज्ज असली पाहिजे. यामुळे कार्यालयीन काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेमध्ये वाढ होईल. कामानिमित्त कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना या सुसज्ज कार्यालयात सुलभ व तात्काळ सेवा उपलब्ध होईल.असे प्रतिपादन राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम वगळून) रविंद्र चव्हाण यांनी केले.

सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर सां.बा उपविभाग पंढरपूर व सां.बा उपविभाग (रोहयो), पंढरपूर या कार्यालयीन इमारतीचे व नवीन शासकीय विश्रामगृह इमारत बांधकाम भूमिपूजन तसेच (मायणी- दिघंची- महुद- पंढरपूर व जिल्हा हद्द पंढरपूर) अंतर्गत पूर्ण झालेल्या कामांचे लोकार्पण (श्री. संत एकनाथ महाराज पालखी मार्ग) सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर,आमदार समाधान आवताडे, माजी आमदार प्रशांत परिचारक, सां.बा. विभागाचे अधिक्षक अभियंता संजय माळी, तहसिलदार सचिन लंगुटे, कार्यकारी अभियंता अमित निमकर, दत्तात्रय गावडे, हेमंत चौगुले, उपअभियंता भीमाशंकर मेटकरी, अशोक मुलगीर तसेच मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण म्हणाले, राज्यातील सर्वच सार्वजनिक विभागाची कार्यालय सुसज्ज व दर्जेदार करण्यात येणार आहेत. पंढरपूर येथील सार्वजनिक बांधकाम उप विभागीय नवीन कार्यालयाच्या इमारत बांधकाम लवकरात लवकर सुरुवात करून वेळेत काम पूर्ण करावे, अशा सूचना मंत्री चव्हाण यांनी यावेळी दिल्या.

उपविभागीय अभियंता कार्यालय बांधकामासाठी ६ कोटी ३७ लाख ५१ हजार रुपयांची प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. यामध्ये तळमजला, पहिला मजला , संरक्षक भिंत,अंतर्गत रस्ते, परिसर सुशोभीकरण आदी कामे करण्यात येणार आहेत. त्याचबरोबर नवीन शासकीय विश्रामगृह इमारतीच्या बांधकामासाठी २१ कोटी १४ लाख ६७ हजार रुपयांची प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. यामधून विश्रामगृहाच्या तळमजलामध्ये १० साधे कक्ष, पहिला मजला येथे ०७ साधे कक्ष, मा.उपमुख्यमंत्री महोदय एक कक्ष व दोन व्ही.आय.पी कक्ष तसेच दुसरा मजला येथे ०७ साधे कक्ष, मा.मुख्यमंत्री महोदय एक कक्ष व दोन व्हिआयपी कक्ष प्रस्तावित करण्यात आले असल्याची माहिती सां.बा. विभागाचे अधिक्षक अभियंता संजय माळी यांनी दिली.

# पंढरपूर शहर काँग्रेस (आय) सोशल मीडिया अध्यक्षपदी महेश जाधव यांची निवड



पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर शहर सोशल मीडिया अध्यक्षपदी महेश जाधव यांची निवड करण्यात आली असून सदर निवडीचे पत्र महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेस आहे मा उपाध्यक्ष सुनेत्रा पवार व सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष सचिन खैरे पाटील यांच्या शुभहस्ते निवडीचे पत्र देऊन करण्यात आली

यावेळी रुक्मिणी परिवाराच्या वतीने मान्यवराचा सत्कार करण्यात आला कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना सुनेत्रा पवार म्हणाले की सर्वांनी मतभेद विसरून एकत्रितपणे पक्ष वाढीसाठी काम करण्याची आव्हान करून सोशल मीडिया च्या माध्यमातून राजकीय प्रक्रिया पक्षाची ध्येय धोरणे ऑनलाइनच्या माध्यमातून जास्तीत जास्त जनतेपर्यंत पोहोचून जनतेची संवाद साधण्यास सांगितले वयाचा वापर पक्ष वाढीसाठी व जास्तीत जास्त करण्याचे सांगितले.

यावेळी पंढरपूर शहराध्यक्ष अमर सूर्यवंशी जिल्हा सरचिटणीस किशोर जाधव सेवादल शहराध्यक्ष गणेश माने शहर उपाध्यक्ष सागर कदम अल्पसंख्याक जिल्हा उपाध्यक्ष शकील रत्नपारखी लोकसभा माढा समन्वयक अजय आधाटे व गायकवाड हे सर्व पदाधिकारी व असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते

# ग्रामीण महिलांची थांबणार पाण्यासाठीची वणवण; सोलापूर जिल्ह्यातील ५.७६ लाख कुटुंबांना घरोघरी नळ कनेक्शन

सोलापूर/प्रतिनिधीः केंद्र सरकारच्या 'हर घर जल नळ'अंतर्गत जलजीवन मिशनमधून ग्रामीण भागातील सोलापूर जिल्ह्यातील तब्बल पावणेसहा लाख कुटुंबांना स्वच्छ व शुद्ध पाण्यासाठी नळ कनेक्शन दिले जाणार आहे. त्यातून प्रत्येक व्यक्तीला दररोज ५५ लिटर पाणी मिळेल. सध्या दीडशे गावांमध्ये योजनेची कामे पूर्ण झाली आहेत. या महत्वकांक्षी योजनेमुळे ग्रामीण भागातील महिलांच्या डोक्यावरील हंडा कायमचा खाली उतरणार असून दुष्काळातील त्यांची पाण्यासाठीची वणवण देखील थांबणार आहे.

सोलापूर म्हंटले की दुष्काळ, पाणी व चारा टंचाई, पाण्यासाठी वणवण भटकंती असे समिकरणच झाले आहे. पण, विविध अडथळ्यांची शर्यत पार करून केंद्र सरकारच्या जलजीवन मिशनमधून 'हर घर जल नळ'अंतर्गत डिसेंबर २०२४पर्यंत सोलापूर जिल्ह्यातील प्रत्येक गावांमध्ये 'जलजीवन'मधून पावणेसहा लाख कुटुंबांना पिण्याच्या पाण्याचे मोफत नळ कनेक्शन दिले जाणार आहेत. सध्या जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांच्या पाठपुराव्यातून योजनेतील कामांना गती प्राप्त झाली असून दर आठवड्याला योजनेच्या कामाचा आढावा घेतला जात आहे. काही महिन्यांपूर्वी योजना व निविदांबद्दल तक्रारी होत्या. त्या सर्व तक्रारींवर सुनावणी घेऊन त्यांचा निपटारा करण्यात आला आहे. आता बहुतेक गावांमध्ये योजनेची कामे सुरू असून पुढील दोन महिन्यांत बहुतांश गावांमध्ये योजना कार्यान्वित कशी होईल, याचे ठोस नियोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील दुष्काळीची तीव्रता कमी करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. ग्रामीण भागातील महिलांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागणार नाही, यादृष्टीने सध्या नियोजन करण्यात आले आहे.

# माता रमाई आंबेडकर जयंती वंचित बहुजन युवा आघाडी च्या वतीने साजरी



उल्हासनगरः शहर वंचित बहुजन युवा आघाडी प्रभाग क्रं ०७ या ठिकाणी ०७ फेब्रुवारी २०२४ रोजी बौद्ध नगर आझाद नगर बॅरेक नंबर ६५३ उल्हासनगर ०२ या ठिकाणी सायंकाळी त्याग मूर्ती माता रमाई यांच्या जयंतीनिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम राबवण्यात आले,या कार्यक्रमाला उपस्थित असणारे अनेक मान्यवर उपस्थित होते.सुरेखा पैठणे वक्ता, कवयित्री,सामाजिक कार्यकर्त्या वंचित बहुजन आघाडीचे उल्हासनगर शहराचे अध्यक्ष(पुर्व) मा . शेषराव वाघमारे साहेब, उल्हासनगर शहराचे अध्यक्ष (पश्र्चीम) उज्ज्वल महाले,संघटक प्रकाश शिरसाठ, अल्पसंख्याक अध्यक्ष आयुब शेख ,उपध्यक्ष महेंद्र अहिरे , वार्ड.अध्यक्ष दीपक आढाव महासचिव प्रवीण माळवे, उपध्यक्ष बाळासाहेब अहिरे, उपध्यक्ष शंकर गायकवाड, सहसचिव उल्हसढगे , युवा संघटक कन्हेया शेळके , उपध्यक्ष कांतीलाल पगारे, नितीन भालेराव, वार्ड. प्रभाकर पाईकराव , वंचित बहुजन आघाडीचे सर्वे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन बाळासाहेब अहिरे यांनी केले

# जल आत्मनिर्भर गाव करण्यासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा : आर.व्ही.चकोर

नळदुर्ग/प्रतिनिधी : दिवसेंदिवस पाण्याची पातळी खाली जात असून पाण्याचे संकट निर्माण होत आहे. पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्यासाठी रेन वॉटर हार्वेस्टिंग ही काळाची गरज आहे. यासाठी जल आत्मनिर्भरगाव करण्यासाठी नागरिकांनी पुढे यावी असे



आवाहन कळंब पंचायत समितीचे गटविकास अधिकारी आर.व्ही.चकोर यांनी केले आहे .आयसीआयसीआय बँक मुंबई ,परिवर्तन सामाजिक संस्था नळदुर्ग , मॅप्स इंडस्ट्रीज (इं) प्रायव्हेट लिमिटे पुणे, पर्जन्य रेन वॉटर हार्वेस्टिंग कन्सल्टन्सी पुणे, यांच्या संयुक्त विद्यमाने बाभळगाव ता. कळंब येथे रेन वॉटर हार्वेस्टिंग कार्यक्रमाचे आज उद्घाटन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते . कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी गावच्या सरपंच सुजाता तुषार वाघमारे या होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून शैलेश झा, असिस्टंट जनरल मॅनेजर मुंबई, शंतनू कालेकर मॅनेजर , अनिरुद्ध तोडकर मॅनेजिंग डायरेक्टर, मॅप्स इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड पुणे, उपसरपंच विजयश्री नानासाहेब वाघमारे, परिवर्तन संस्थेचे मारुती बनसोडे इत्यादी उपस्थित होते. त्यावेळी बोलताना चकोर म्हणाले की,पाणी म्हणजे जीवन आहे पाणी नसेल तर जीवन नसेल यासाठी पाणी संवर्धन ही काळाची गरज असून पाणी संवर्धनाच्या अनेक पद्धती आहेत यातील रुफ टॉप रेन वॉटर हार्वेस्टिंग अत्यंत उपयुक्त पद्धत आहे. यासाठी आयसीआयसीआय बँकेने अर्थ सहाय्य केले असून या कामात सर्वांनी सहकार्य करावे असे आवाहन त्यांनी केले आहे. यावेळी शंतनू कालेकर, राजू तेली, अनिरुद्ध तोडकर यांची भाषणे झाली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन परिवर्तन सामाजिक संस्थेचे सचिव मारुती बनसोडे यांनी केले तर आभार प्रदर्शन तुषार वाघमारे यांनी केले यावेळी रेन वॉटर हार्वेस्टिंग च्या डेमो प्लांट चे उद्घाटन शैलेश झा व आर . व्ही.चकोर यांच्या हस्ते करण्यात आले

# खेडच्या स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट मध्ये 'पालक सभा' संपन्न



सोलापूर/प्रतिनिधीः खेड (ता.उत्तर सोलापूर) येथील स्वेरी तथा श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटच्यूट, पंढरपूर संचलित एस.व्ही.आय.टी. तथा स्वामी विवेकानंद इन्स्टिटच्यूट ऑफ टेक्नोलॉजीच्या पॉलिटेक्निक महाविद्यालयात दि.०१ फेब्रुवारी २०२४ रोजी 'पालक सभा' आयोजित करण्यात आली होती. या पालक सभेला पालकांकडून उस्फुर्त प्रतिसाद मिळाला.

दीप प्रज्वलनानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.एस.पाटील यांनी अल्पावधीत विद्यार्थीप्रिय बनलेल्या खेडच्या स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजीच्या यशाचा आलेख सादर करून पालकांचे स्वागत केले. यावेळी पालक प्रतिनिधी दादासाहेब गायकवाड व महिला पालक प्रतिनिधी म्हणून सौ.मीरा नाटे या व्यासपीठावर उपस्थित होत्या.पुढे विद्यार्थ्यांच्या करिअरच्या दृष्टीने पालकांना उत्तम पद्धतीने मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, 'विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी मानून आणि स्वेरीच्या

अभूतपूर्व यशाच्या आधारे स्वेरीचे संस्थापक सचिव डॉ. बी.पी. रोंगे यांच्या दिशादर्शक मार्गदर्शनाखाली स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट मधील विद्यार्थ्यांच्या विकासाच्या दृष्टीने या देखील संस्थेची योग्य वाटचाल सुरु आहे.' असे सांगून प्राचार्य डॉ.एस.एस.पाटील यांनी महाविद्यालयाच्या यशाचा आलेख पालकांसमोर सादर केला. यावेळी सर्व विभागप्रमुखांतर्फे विभागातील उपलब्ध साहित्य सामग्री, विद्यार्थ्यांसाठी संस्थेकडून पुरविण्यात येणाऱ्या सुविधा या संदर्भात माहिती देण्यात आली. पालक सभेचे औचित्य साधून गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार देखील करण्यात आला. त्यामध्ये कॉम्प्युटर विभागातून प्रथम क्रमांक मिळविलेले श्रेयश महेश कुलकर्णी (८९ %), हर्षदा दत्तात्रय काकेकर (८८%), धवलराज दादासाहेब गायकवाड (८७ %), इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागातून विक्रांत राजेंद्र शिंदे (८७.१८ %), ओंकार रणजीत कदम (८४ %), प्रतिक्षा प्रसन्न चव्हाण (८३%), मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातून आदित्य सचिन गुळवे (८४ %), ईश्र्वरी विजय ताटे (८३.१८ %), विकास मारुती यांकीकर (८२.२४ %), सिव्हील इंजिनिअरिंग विभागातून प्राप्ती चंद्रकांत सुडके (८०.१२ %), रोशनी बंडू पुजारी (७९.२९ %), आदित्य संतोष शिरसागर (७८.२४ %), या विद्यार्थ्यांचा समावेश होता. यावेळी यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ..बी.पी.रोंगे यांनी विशेष कौतुक करून पाठ थोपटली. या पालक सभेत सोलापूर व खेड पंचक्रोशीतील जवळपास १५० पालक उपस्थित होते. यावेळी पालकांनी 'संस्थेवर विश्र्वास ठेवल्याचे सार्थक झाले' असे म्हणून महाविद्यालयाच्या सोयी-सुविधांबाबत गौरवोद्गार काढले. यावेळी प्रा. एस. एन. शिंदे, प्रा. पी. यू. वाघमारे, प्रा. ए. सी.सावंत, प्रा. एस. एस. पाटील, प्रा. के. ए. पाटील, प्रा.एस. एन. पाटील, प्रा. टी. आर. खरटमल, प्रा. जे. एस. ताटीकोंडा, प्रा. ए. एस. कांबळे, प्रा. एस. के. गायकवाड, प्रा. एस. एस. भोसले, प्रा. पी. एस. माळी आदी प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. पी.एच.खोले यांनी केले तर आभार प्रा.श्रीधर कुलकर्णी यांनी मानले.